# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, मार्च १५, २००४/फाल्गुन २५, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—मध्य उप-विभाग

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

### राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ मार्च २००४

### आदेश

क्रमांक एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.-८५/कार्या-०५.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेडए अन्वये राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

२. आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक एसईसी/जीईएन/२००२/सीआर-३९/डी-१०, दिनांक ३ जुलै २००२ अन्वये प्रतिज्ञापत्र (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती निवडणुकांकरिता) आणि घोषणापत्र (ग्रामपंचायती निवडणुकांकरिता) विहित करण्यात आले आहे.

३. आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुकांसंदर्भात दाखल करावयाच्या प्रतिज्ञापत्रासंदर्भात काही सूचना व निरीक्षण विचार प्रकट केले आहेत, त्या दृष्टिकोनातून यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ३ जुलै २००२ रोजी दिलेले आदेश सुधारित करणे आवश्यक आहे.

४. त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ ए (४), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १४ (४), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २) च्या कलम ९-बी (४), महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम



[किंमत रुपये १०.००]

१०-ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महा. ५) च्या कलम ९-ए (४), मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०-ए (४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर करून राज्य निवडणूक आयोगाने यासंदर्भात यापूर्वी दिलेल्या आदेशांचे अधिक्रमण करून खालीलप्रमाणे सुधारित आदेश देत आहे :—

(१) प्रत्येक उमेदवार जिल्हा परिषदा किंवा पंचायत समित्या किंवा महानगरपालिका किंवा नगरपरिषदा किंवा नगरपंचायती यांच्या सार्वत्रिक अथवा पोट-निवडणुकीकरिता नामनिर्देशनपत्र दाखल करताना शपथपत्रात विनिर्दिष्ट केलेली संपूर्ण माहिती सादर करेल; या आदेशासोबतच्या जोडपत्र-एक मध्ये विहित नमुन्यातील शपथपत्राचे प्रपत्र जोडले आहे. परंतु, ग्रामीण भागात शपथपत्र दाखल करण्याकरिता येणाऱ्या अडचणी विचारात घेता मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ नुसार ग्रामपंचायत निवडणुकांकरिता निवडणूक लढविणारा उमेदवार शपथपत्राऐवजी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमोर घोषणापत्र दाखल करेल. या आदेशासोबत जोडपत्र-दोन मध्ये विहित नमुन्यातील प्रपत्र जोडले आहे.

(२) प्रत्येक उमेदवाराने उपरोक्त शपथपत्र प्रथमवर्ग दंडाधिकारी, लेख प्रमाणक (नोटरी पब्लिक), उच्च न्यायालयाने नेमलेले ओथ कमिशनर अथवा शपथपत्र देण्यासाठी सक्षम असलेला अधिकारी (यामध्ये जिल्हा दंडाधिकारी/उपविभागीय दंडाधिकारी/तालुका दंडाधिकारी यांचा समावेश होतो) यांच्यासमोर करण्यात यावे.

(३) उमेदवाराने शपथपत्र अथवा घोषणापत्र सादर न करणे हे या आदेशाचे उल्लंघन असल्याचे मानण्यात येईल आणि निवडणूक निर्णय अधिकारी संबंधित उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र छाननीच्या वेळी शपथपत्र/घोषणापत्र सादर न केल्यामुळे नाकारू शकेल.

(४) अशाप्रकारे उमेदवाराने सादर केलेल्या यथास्थिती शपथपत्र अथवा घोषणापत्रातील माहितीचा संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी सथास्थिती शपथपत्र अथवा घोषणापत्राची प्रत त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर चिटकवून त्याचा प्रसार करेल आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निश्चित केल्यानुसार प्रती काढण्याकरिता येणारे शुल्क आकारून त्याच्या प्रती प्रचाराचा कालावधी संपेपर्यंत पुढे नमूद केलेल्यांना उपलब्ध करून देण्यात येतील :—

(एक) संबंधित निवडणूक लढविणारा कोणताही उमेदवार ;

(दोन) कोणताही मुद्रण/इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमाचा प्रतिनिधी ;

(तीन) कोणताही लोक प्रतिनिधी.

(५) कोणत्याही प्रतिस्पर्धी उमेदवाराने स्वतः केलेल्या शपथपत्राद्वारे किंवा घोषणापत्राद्वारे परस्पर विरोधी माहिती सादर केली असली तरी ; ती माहिती संबंधित उमेदवाराच्या शपथपत्र किंवा घोषणापत्रासोबत वर नमूद केल्यानुसारच प्रसारित करण्यात येईल.

(६) निवडणूक निर्णय अधिकारी शपथपत्रात/घोषणापत्रात दिलेल्या माहितीची सारांशाने छाननी करून अथवा अन्यप्रकारे त्याची सत्यता पडताळून पहाणार नाही आणि त्याच्या/तिच्या मते माहिती चुकीची आढळली याच्या आधारे नामनिर्देशनपत्र नाकारणार नाही.

५. नामनिर्देशनपत्रासोबत सर्व उमेदवारांना आयोगाने याद्वारे विहित केलेल्या यथास्थिती शपथपत्र अथवा घोषणापत्राच्या प्रती देण्यात येतील, याची सर्व निवडणूक निर्णय अधिकारी खात्री करतील.

६. हे आदेश दिनांक १ एप्रिल २००४ पासून अंमलात येतील आणि राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या निदेशानुसार घेण्यात येणाऱ्या निवडणुकांना लागू रहातील.

य. ल. राजवाडे,
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र.

The Formats with this order are revised vide order dt. 05.10.2015

110